# त्याची अद्‌भुत प्रीति आणि कृपा

## साराच्या पत्रात आपले स्वागत आहे !

प्रभु येशूच्या मोलवान नावामध्ये जे सर्वांत उंच आहे , आपणांस नमस्कार !

माझ्या प्रिय मित्रा, काय आपण नव्या जीवनासाठी आशा केली आहे ज्यामध्ये संपूर्ण शांति, आनन्द आणि प्रीतिची मात्रा भरपूर आहें? काय आपण निराशा, चिंता, अपराध, लज्जा, भीति, आशाहिनता, एकाकीपण, इतकेच नव्हें तर मृत्यू आणि आत्महत्येच्या विचाराने चिंतित आहात काय?

आजपासून आपण प्रभु येशूमध्ये नवीन जीवनाचा आनन्द उचलू शकता. हे देवाकडून आपल्यासाठी फुकटचे दान आहे. या नवीन जीवनाला घेण्यासाठी आपण तैय्यार आहात काय? तेव्हा कृपाकरुन काळजीपूर्वक वाचा ......

पवित्र शास्त्र सांगते .......

देवाने (पृथ्वीच्या मातीपासून) आपला प्रतिरुपाचा मनुष्य निर्माण (बनवला) केला. तेव्हा देवाने त्याच्या नाकात आपला श्वांस फुंकला आणि त्याच्यामधे जीवनाचा संचार झाला. देवाने प्रथम मनुष्याचे नाव आदम ठेवले. (उत्पत्ति 1:27, 2:7 पहा).

देवाने आदमला स्त्री (हव्वा) (स्त्रीलिंग) सहायताच्या रुपाने दिली. ते एदेनच्या बागेमध्ये राहू लागले. देवाने त्यांना सांगितले कि ते सर्व वृक्षांचे फळ बेखटके खाऊ शकतात परन्तु चांगले आणि वाईटाचे जे वृक्ष आहें, त्याचे फळ कधी खाऊ नये, कारण ज्या दिवशी ते त्याचे फळ खातील त्याच दिवशी ते अवश्य मरण पावतील. (उत्पत्ति 2:17:25).

परन्तु ज्या फळाला देवाने मनाई केली होती, तेच फळ त्यांनी खाल्ले आणि या प्रकारे आदम आणि हव्वाने अनाज्ञाकारी होऊन देवाच्या विरुध्द पाप केले. याचा परिणाम हा झाला कि ते आत्मिक रीतिने मरण पावले (ते देवापासून दूर झाले आणि त्यानंतर शारिरिक रीतिने सुध्दा मरण पावले- रोमकरांस पत्र 5:12) आणि एदेनच्या बागेमधून त्यांना बाहेर केल्या गेले.

पवित्र शास्त्र सांगते ........

*“ह्या प्रकारें एका मनुष्याच्याद्वारें पाप जगांत आलें आणि पापाच्या द्वारें मरण आलें, आणि सर्वांनीं पाप केल्यावरून सर्व मनुष्यांत मरण पसरलें.”* (रोमकरांस पत्र 5:12).

*“नीतिमान कोणी नाहीं, एक देखील नाहीं”* (रोमकरांस पत्र 3:10).
*“सदाचारानें वागणारा व पाप न करणारा असा धार्मिक पुरुष पृथ्वीवर आढळणार नाहीं.”* (उपदेशक 7:20).

*“कारण सर्वांनी पाप केलें आहे, आणि देवाच्या गौरवाला तें अंतरले आहेत.”* (रोमकरांस पत्र 3:23).

“पाहा, सर्व जीवं माझे आहेत, बापाचा जीव तसा पुत्राचा जीवहि माझा आहे, जो जीवात्मा पाप करितो तो मरेल.” (यहेज्केल 18:4).

*“पापाचें वेतन मरण आहे”* (रोमकरांस पत्र 6:23a).

या प्रकारे जगाचें सर्व लोक पाप आणि स्त्रापाचे गुलाम झाले, आणि शेवटी नरकाच्या आगीमध्यें टाकले जातील, परन्तु ........

*“...पण देचाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्यें सर्वकालचें जीवन आहे.”* (रोमकरांस पत्र 6:23b). (सर्वकालिक जीवन म्हणजें पाप आणि नरकांपासून सुटकारा आणि प्रभु येशू ख्रिस्तासंगती स्वर्गामध्ये नेहमीसाठीं राहणे).

कारण देवाने जगावर एवढी प्रीति केली कीं त्यानें आपला एकुलता एक पुत्र आम्हालां पापाच्या आणि नरकाच्या आगीपासून सुटकारा (वाचवण्यासाठी) देण्यासाठीं पाठवला.

*“कारण देवानें जगावर* (तुम्हीं आणि मीं) *एवढी प्रीति केली कीं त्यानें* (देवानें) *आपला एकुलता एक पुत्र* (येशू) *दिला, यासाठीं कीं जो कोणी त्याजंवर* (येशूवर) *विश्वास ठेवितो त्याचा नाश होऊं नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावें”* (योहान 3:16).

प्रभु येशू ख्रिस्त देवाचा पुत्र आला आणि आमच्या जागी तो मरण पावला जेणेकरुन तो आपल्या पापरहित जीवनांपासून आणि मोलवान रक्ताने पापाची किमत भरु शकतो. येशूला पूरल्या गेले आणि देवाने त्याला मेलेल्यातून जीवंत केले. (रोमकरांस पत्र 5:8, 8:32, 10:9b पहा).

*“...रक्तपातावांचून पापमोचन होत नाहीं”* (इब्री लोकांस पत्र 9:22).

*“कारण शरीराचे जीवन रक्तांत असतें, आणि तुमच्या जिवाबद्दल प्रायश्चित व्हावें म्हणून ते तुम्हांस वेदीवर दिलें आहे, कारण जिवाबद्दल प्रायश्चित रक्तानेंच होतें.* (लेवीय 17:11,14, उत्पत्ति 9:4).

*“ज्याला पाप ठाऊक नव्हतें त्याला* (येशू) *त्यानें तुमच्याआमच्याकरितां पाप असें केलें, यासाठीं कीं आपण त्याच्याठायीं* (येशूमध्यें) *देवाचें नीतिमत्व असें व्हावें.* (2 करिंथकरांस पत्र 5:21).

देवाने आपला भाग पूर्ण केला. आता आपली वेळ आहें. आता आपणाला काय करायला हवें? वाचणें चालू ठेवा .......

प्रभु येशूने म्हटले, जर कोणी स्वर्गाला जाऊं इच्छितों, त्यानें आपल्या आत्म्यांमध्यें जे खऱ्या अर्थानें आपल्याला आदम पासून वारीस म्हणून मिळाली आहें. (जे खऱ्या अर्थाने आदमच्या पापामुळे मरण पावली) त्यामध्ये नवीन जन्म घेतला पाहिजे, नवीन रीतिने जन्म घ्या. येशूने उत्तर दिले, *"मी तूला खचित खचित सांगतों, पाण्यापासून व आत्म्यापासून जन्मल्यावांचून देवाच्या राज्यांत प्रवेश करितां येत नाहीं.* (योहान 3:5)

{येथे पाणी म्हणजें देवाचे वचन आहें, ज्याचा सध्या आपण वाचन करित आहातं आणि आत्मा म्हणजें (इंग्रजीमध्यें कॅपिटल एस्) देवाचा पवित्र आत्मा होय}.

*"तुम्हीं त्याच्या द्वारें देवावर विश्वास ठेवणारे झालां आहां, त्या देवानेच त्याला मृतावस्थेंतून उठवून त्याचें गौरव केलें, यामुळें तुमचा विश्वास व आशा देवावर आहे".* (1 पेत्र 1:21).

अजून स्पष्ट रीतिने माहिती करण्यासाठीं, जर एक पापी देवाच्या वचनाला ऐकतों तेव्हां वचन त्याच्या हृदयाला स्पर्श करतें.

*"देवाचे वचन सजीव, सतेज, कोणत्याहि दुधारी तलवारीपेक्षां तीक्ष्ण, जीव व आत्मा, सांधे व मज्जा यांस भेदून आरपार जाणारें आणि मनाच्या भावना व कल्पना यांचे परिक्षक असे आहे.* (इब्रानियों 4:12)

पवित्र आत्मा त्याला त्याच्या 'पापाबद्दल' आणि 'धार्मिकतेबद्दल' आणि 'न्यायाबद्दल' सांगेल. (योहान 16:7–12 पाहा) पवित्र आत्मा आपणांस हे सांगण्याचा प्रयत्न करेल की आपण (सर्व लोक) नरकाच्या आगीमध्ये जात होतो. जर आपण नम्र होऊन देवाकडे पाहतों आणि आपल्या पापांपासून पश्चाताप करतों, तेव्हां देव :

- आपणास आपल्या पापापासून मुक्त करील.
- आपणाला शाश्वती देईल की प्रभु येशू खिस्त आपल्या जागी मरणासाठीं आला.
- आपल्याला कृपा (ज्या कृपेसाठीं आपण हकदार नाहीं) देईल की आपण प्रभु येशू खिस्ताला आपल्या जीवनांत प्रभु आणि व्यक्तिगत जीवनांत तारणारा म्हणून स्वीकार (मानून घेणे, अंगीकार करणे) करावें।

आपल्याला सरळ रीतिने देवाच्या समोर आपली पापें मानली (अंगीकार, क्षमायाचना करणे) पाहिजे आणि प्रामाणिकपणें त्याच्यासमोर पश्चाताप केले पाहिजे. याचा अर्थ असा आहें की आपण आपल्या पापांसाठी देवासमोर आपली सहमती प्रकट करायला पाहिजे आणि त्यांच्यापासून दूर व्हायला पाहिजे, त्याच्या वचनानूसार पवित्र आणि खरे जीवन जगायला देवाजवळ यायला पाहिजे. देव आपल्या स्वीकृतीची वाट पाहत आहे जेणेकरुन आपल्या पापाची क्षमा देऊन प्रभु येशू खिस्ताच्या मोलवान रक्ताद्वारें शूध्द आणि पांढरे करेल.

*“जर आपण स्वतःची पापें पदरीं घेतों, तर तो विश्वासू व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अधर्मापासून शुध्द करील.* (1 योहान 1:9)

*“परमेश्वर म्हणतो, चला, या, आपण बुध्दिवाद करुं, तुमची पातकें लाखेंसारखीं लाल असलीं तरी तीं बर्फासारखीं पांढरी होतील, ती किरमिजासारखीं तांबडीं असलीं तरी लोकरीसारखीं निघतील.* (यशायाह 1:18)

असे समजून चला की आपण पाव्हण्यांना जेवणांवर निमंत्रित केले. आपण काय करणार? आपण आपल्या घराला स्वच्छ करणार आणि जेव्हा पाव्हणें आपल्या घराच्या दारावर जेव्हां ठकठक करतील तेव्हा आपण दार उघडून ‘कृपाकरुन आंत या’ असे म्हणू. खरे की नाही?

ज्या प्रकारे आम्हीं पाव्हण्यांना स्वीकार करण्यांसाठी आपल्या घराला साफ करतो, त्या प्रकारे आपल्या हृदयांत येशूला स्वीकार करण्यांसाठी आपल्या हृदयांला स्वच्छ ठेवले पाहिजे. प्रथम पायरी ही की आपण स्वीकार करायला पाहिजे की आपले हृदय घाणेरडे (पापांने भरपूर) आहे. खरे पाहिले असतां आपले हृदय इतके खराब आहें की आम्हीं पाहू सुध्दा शकत नाही की ते किती खराब आहे.

*“हृदय सर्वांत कपटी आहे, ते असाध्य रोगानें ग्रस्त आहे, त्याचा भेद कोणास समजतो?”* (यिर्मया 17:9)

*“.....देवानें मनुष्य सरळ असा उत्पन्न केला आहे, पण तो अनेक कल्पनांच्या मागें लागला आहे.”* (उपदेशक 7:29)

साबण आणि पाणी आपल्या हृदयाला शूध्द करु शकत नाही. फक्त प्रभु येशू खिस्ताचे मोलवान रक्त आपल्या पापी हृदयाला शूध्द करु शकते.

*“...त्याचा पुत्र येशू याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुध्द करितें.”* (1 योहान 1:7b)

*“आपली एकमेकांबरोबर भागी आहे, आणि त्याचा पुत्र येशू याचें रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुध्द करितें”* (1 योहान 1:7-8).

“वाडवडील माणसांच्या परंपरेनें चालत आलेल्या आपल्या व्यर्थ वागणुकीपासून सोनें, रुपें अशा नाशवंत वस्तूंनी नव्हे, तर निष्कलंक व निर्दोष कोकरा, असा जो खिस्त, त्याच्या मूल्यवान रक्तानें तुम्ही मुक्त झालां हें ध्यानांत ठेवा.” (1 पतरस 1:18-19)

आमचे शरीर हे घर और हृदयाचें दार आहे. हे आतून बन्द आहे. आम्हाला हे उघडायला पाहिजे, दार उघडा आणि आपल्या हृदयात येशूला आमंत्रित करा.

*“पाहा, मी दाराजवळ उभा आहें व ठोकीत आहें, जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ आंत जाईन व त्याजबरोबर जेवीन आणि तो मजबरोबर जेवील.”* (प्रकटीकरण 3:20)

यास्तव, प्रिय मित्रा, कृपाकरुन आता काय आपण ही लहाणशी प्रार्थना कराल जेणेकरुन आपण आपल्या हृदयात येशूला आमंत्रित करु शकता? याला फक्त एक मिनट लागते. पवित्र शास्त्र सांगते,

“जर तूं आपल्या मुखानें येशू प्रभु आहे असें स्वीकारशील, आणि देवानें त्याला मेलेल्यांतून उठविलें असा आपल्या अंतःकरणांत विश्वास धरशील तर तुला तारणप्राप्ति होईल. नीतिमत्वासाठीं विश्वास धरणें अंतकरणानें होतें, तारणाचा स्वीकार करणें तोंडानें होतें.” (रोमकरांस पत्र 10:9–10)

कृपाकरुन काळजीवपूर्वक वाचा, विश्वासाने प्रार्थना करा, जेणेकरुन आपण स्वतः आपल्या कानानें ऐकू ! हे फार महत्वाचें आहें की आपण आपल्या हृदयानें गंभीरतापूर्वक प्रार्थना करतो.

आणि हे आठवणीत राहू द्या की आपण देवाजवळ प्रार्थना करित आहां माझ्याजवळ नाही.

या, आता आपण प्रार्थना करुं या ......

**प्रिय देवा, मी पापी आहे. मला क्षमा कर. कृपाकरुन माझ्या पापांला क्षमा कर. प्रभु येशूच्या रक्ताद्वारें मला शूध्द कर आणि बर्फासारखें श्वेंत कर. मी विश्वास करितो की प्रभु येशू ख्रिस्त माझ्यासाठी मरण पावला, पूरल्या गेला. मी विश्वास करितों की आपण प्रभु येशू ख्रिस्ताला मेलेल्यातूंन जीवंत केले.**
**आता मी प्रभु येशूला आपल्या जीवनांत प्रभु आणि तारणारा म्हणून स्वीकार करतो.**
**माझ्या प्रभु येशू, कृपाकरुन आता माझ्या हृदयांत या.**
**प्रभु येशू , मी माझी आत्मा, मन आणि शरीर तुझ्या हवाली करतों.**
**प्रभु येशूच्या नावांने मी आपल्या जीवनाच्या शैतानांला व त्याच्या कार्याला दपटतों.**
**प्रभु येशू, कृपाकरुन मला आपल्या पवित्र आत्म्यानें भर आणि मला आपल्या इच्छा अनूसार बनव आणि मला प्रत्येक सत्यामध्यें मार्गदर्शन कर.**
**पित्या, मी तूला माझ्या जीवनाला वाचविण्यासाठी आणि माझ्या पापाला क्षमा करण्यांसाठी आणि मला आपली मूल्यवान संतान बनविण्यासाठी धन्यवाद देतों.**
**येशूच्या नावांने प्रार्थना करतों. आमीन.**

आता जर आपण आपल्या हृदयाच्या गंभीरतेने प्रार्थना केलेली आहे, तेव्हां हे माझ्या प्रिय मित्रा, मी तुमच्याजवळ एक साधारण प्रश्न करणार आहें. विचार करुन मला सांगाः
येशू सद्या कोठें आहें?
.

.
.
.
.
जर आपले उत्तर आहे की “येशू आता माझ्या हृदयांत आहे”, तेव्हा माझा विश्वास होईल की आपण खरोखर प्रार्थना केलेली आहें. (जर आपले उत्तर नाही आहे तेव्हां आता कृपाकरुन काळजीपूर्वक प्रार्थना करां.)

होय, आता प्रभु येशू ख्रिस्त आपल्या हृदयांत आहे. जेव्हां आपल्याला काहीं प्राप्ति होतें तेव्हा आपण उपकार मानतों म्हणतों. नाही? उपकार माननें हे विश्वासाला व्यक्त करण्याचा सरळ मार्ग आहें. कृपाकरुन म्हणां, “उपकार मानतों येशू”.

जो पर्यंत आपण येशूला प्रभु आणि तारणारा स्वीकार करण्याची प्रार्थना करित नाहीं तो पर्यंत तुमचे नातें देवाबरोबर “सृष्टिकर्ता आणि त्याची सृष्टि” आहें. परन्तु आता तो “प्रेमी पिता आणि प्रिय पुत्र, पुत्री” मध्यें बदला झालेला आहें. कृपाकरुन या गोष्टीला सूध्दा समजून घ्या की जों पर्यंत तुम्हीं प्रभु येशूला स्वीकार करित नाहीं तो पर्यंत शैतान तुमचा पिता आहें. परन्तु आता, देव तुमचा पिता बनला आहें आणि तुम्हीं त्याची मूल्यवान संतान बनलेले आहां. (योहान 8:44) पाहां की आपण त्याचे किती कर्जदार आहों.

कोणालाही देवाची संतान बनण्यासाठी योहान 1:12-13 अनूसार फक्त एकच शर्त आहे.....*“जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांस, म्हणजें त्याच्या नावांवर विश्वास ठेवणाऱ्यांस, त्यानें देवाची मुलें होण्याचा अधिकार दिला”.*

या जगांमध्ये फक्त एकच गोष्ट प्रेम सोडून पैशाद्वारें आपल्याला सर्व काहीं मिळु शकते. हिच गोष्ट देवाला आमच्याकडून पाहिजे. पुष्कळ लोंक देवाजवळ आपली कामें करायला जातांत, आणि त्याच्यानंतर ते आपल्या इच्छेनें निघून जातात.

जेव्हां आपण जेवण तैय्यार करतों तेव्हां आपण त्याला चाखून बघतों की ते किती स्वादिष्ट बनलेले आहें. जर ते स्वादिष्ट बनले तेव्हां आपण ते दूसऱ्याला देतों. त्याचप्रमाणें मी प्रभु येशूच्या प्रेमाला चाखलेलें आणि पाहिले आहें की तो किती चांगला आहें. म्हणून मी आपणाला सांगू इच्छिते की तूम्हीं त्याला आपल्या जीवनांत व हृदयांत आमंत्रित करा. आपल्याला हे समजायला पाहिजे की देवाने आपल्यासाठी काय केले आहें आणि आम्हीं त्याला सर्व हृदयानें, मनानें आणि शक्ति आणि बुध्दिनें प्रेम करायला पाहिजे. (लूक 10:27)

*“परन्तु देव आपल्यावरच्या स्वप्रेमाचें प्रमाण हें देतो कीं आपण पापी असतां ख्रिस्त आपणांसाठी मरण पावला”* (रोमकरांस पत्र 5:8).

*“ज्यानें आपल्या पुत्रास* (येशू) *राखून न ठेवितां आपणां सर्वांकरितां त्याला दिलें, तो त्याजसहित आपल्याला सर्व कांहीं कसे देणार नाहीं?”* (रोमकरांस पत्र 8:32).

वचनानूसार, आता आपले तारण (नवीन जन्म) झालेले आहे. आता आपण देवाच्या घराण्यांत नवीन जन्मलेले बाळ आहांत. यास्तव आनन्दित व्हा आणि मजा करा. नवीन जन्माचां अर्थ प्रभु येशू ख्रिस्तात 'एकदम नवीन व्यक्ति'. याच गोष्टीची देव आपणांकडून अपेक्षा करतों.

*"जर कोणी ख्रिस्ताच्या ठायीं आहे तर जो नवी उत्पत्ति आहे, जूनें तें होऊन गेलें, पाहा, ते नवें झाले आहे."* (2 करिंथकरांस पत्र 5:17)

ही देवाची सरळ "तारणाचीं योजना" आहें, ज्याला "नवीन जन्म घेणे" सूध्दा म्हणतात.

---

प्रिय मित्रा, आपण एड्स, क्षयरोग, हृदयरोग, कमरेची पीड़ा किंवा अन्य प्रकारच्या आजाराने पीड़ीत आहां काय? आपण मस्तिष्क रीतिने पीड़ीत आहां काय? देवाचा पुत्र प्रभु येशू ख्रिस्त आपला देव आणि बरे करणारा आहे. येशु ख्रिस्त आपल्या शरीराच्या आणि मस्तिष्कच्या प्रत्येक आजाराला बरे करु शकतो. परन्तु आपणाला त्याच्या नावांला गौरव द्यायला पाहिजे. बरे झाल्यानंतर आपल्याला बरे होण्याची साक्ष जास्तीत जास्त लोकांना सांगायला (घोषणा) पाहिजे की मी प्रभु येशू ख्रिस्ताच्या द्वारे बरा झालों, आणि याप्रकारे प्रभु येशूच्या नावांला गौरव द्या. होय जर, आपल्याला दूखणें आहे तर शरीराच्या त्या भागांवर हाथ राखा आणि याप्रकारें प्रार्थना करा :

"हे माझ्या प्रभु येशू , आपण देवाचे पुत्र आहां. आपल्या 1 पेत्र 2:24 वचनानूसार "त्याला बसलेल्या माराच्या वळांनीं तुम्हीं निरोगी झालां" आपण मला निरोगी करणारें आहां. मी (आपल्या आजाराचे नावं घ्या) ने रोगी आहों. आपण मला उत्तर देऊ शकता आणि मला पुर्णपणें निरोगी करु शकतां. मी आपल्या जीवंत वचनाला वाचीन आणि आपल्या नावांला गौरव देऊन बाकीचे जीवन त्याच्या अनूसार व्यतीत करीनं. आपल्या त्या निरोगी करणाऱ्या वळांसाठी उपकार मानतों. मला निरोगी करण्यासाठी उपकार मानतों.

---

अजून माहीतीसाठीं ........
शुभवर्तमान आहें तरी काय?

जेव्हां वेळ दिल्या गेली तेव्हां मनुष्यानें देवाच्या मोबदली शैतान, जीवनांच्या मोदबली मृत्यू, स्वर्गाच्या मोबदली नर्क, आशीर्वादाच्या मोबदली शापाचे चयन केले. शुभवर्तमान प्रेमाचा संदेश आणि मनुष्याच्या मूर्ख चयनाला देवाकडून क्षमा देणें आहें.

शुभवर्तमान हे सांगतें की जर मनुष्य आपल्या पापमय स्वभावांचा अंगीकार करतो आणि विश्वास करतों की प्रभु येशूनें मनुष्याच्या पापांसाठी आपले मोलवान रक्त वाहिले आणि मृतकांतून जीवंत झाला तेव्हां प्रेमळ आणि क्षमा करणारा देव मनुष्याच्या पापाला क्षमा करण्यासाठी आणि त्याला अनन्तकाळापर्यंत प्रेम करण्यांसाठी तैय्यार आहें. देव अशा लोकांना अधिकार देतों जे आपल्या संपूर्ण हृदयांने त्याची मुलें होण्यासाठी स्वीकार करतात आणि विश्वास करतात. हे सूध्दा मनुष्याच्या निवडणूकींवर अवलंबून आहे.

या गोष्टींला अजून सोपे करण्यांसाठी, आपण कोण्यातीही हरवलेली वस्तूसांठी किंवा हरवलेल्या व्यक्तिंसाठी न्युज पेपरमध्यें किवा टेलिविजनवर जाहिराती पाहिल्या असतील. जाहिराती देणाऱ्या व्यक्तिने हरवलेली वस्तु आणण्यांसाठी किंवा हरवलेल्या व्यक्तिला शोधण्यांसाठी बक्षीसाची घोषणा केलेली असणार. याला दान म्हणतात, हे सर्व लोकांसाठी आहे जे टेलिविजन पाहतात किंवा न्युज पेपर वाचतात. पण बक्षीस फक्त त्या लोकांना मिळतें जे त्या हरवलेली वस्तूला जाहिरात देणाऱ्या व्यक्तिजवळ आणतात. होय की नाही.

त्याचप्रकारे, प्रभु येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवाने तारणाचे फुकटचे बक्षीस (शुभवर्तमान) सर्व लोकांसाठी ठेवलेले आहें. जगाच्या सर्व लोकांना ऐकण्यांसाठी देव मार्ग तैय्यार करील. परन्तु फक्त जे त्याच्यांवर विश्वास करतात आणि त्याला स्वीकार करतात ते त्या तारणाच्या बक्षीसाला प्राप्त करतील. आपल्याला ते प्राप्त करण्यांसाठी काहीं किंम्मत द्यायची आवश्यकता नाही, यास्तव "देवाचे फुकटचे दान" लिहिलेले आहें. (रोमकरांस पत्र 6:23b)

*देवाच्या अवर्णनीय दानांबद्दल त्याची स्तुति असो.* (2 करिंथकरांस पत्र 9:15)

"फुकटचे बक्षीस" याचा अर्थ "कमी किमतींचे बक्षीस" नाहीं. तारण सर्वात महाग आहें आणि हे देवाकडून मनुष्याला अनमोल बक्षीस आहे कारण मोल प्रभु येशूने (आमच्या पापांच्या मोबदल्यांत) आपल्या मोलवान रक्त आणि जीवनाच्या द्वारे चुकते केले आहे. हे आमच्यासाठी देवाचे प्रेम आहे.

असे समजून चला की, मी आपणाला बक्षीस म्हणून एक पेन दिला. आपण म्हणू शकता, "अरे हे तर फक्त पेन आहे" आणि निष्काळजीने आपण त्याला कोठेही फेंकून द्याल किंवा आपण असे म्हणू शकता, "अरे, हा पेन किती सुन्दर आहे" आणि त्याला रोज उपयोगी करणार. हे आपली निवडणूक आहे. आपल्या तारणारा जीवंत ठेवा. देव आपणांला पुष्कळ आशीर्वाद देवो.

पवित्र शास्त्र (देवाचे वचन) देवाकडून आपल्या आणि माझ्यासाठी आणि समस्त मनुष्यजातीसाठी "चेतावनी पुस्तिका" आहें. देचाची चेतावनी आम्हांला सांगते की आपण कसे जीवन जगावें....आपल्या काय करावे आणि काय नाहीं करावें....आणि आम्हांला ही सूध्दा चेतावनी मिळतें की यानंतर जीवनांसाठी तैय्यारी कशी करावी. फक्त पवित्र शास्त्र आम्हांला स्वर्ग आणि नर्काबद्दल स्पष्ट रीतिने सांगते. जर आपण नवीन स्थान, देशाला जाण्यांसाठी योजना तैय्यार करतों तेव्हां आपण जास्तीत जास्त त्या स्थानाबद्दल, देशाबद्दल माहिती घ्यायचा प्रयत्न करतों, तेथे कसे जावें, कोठे थांबावे, कोणते स्थान बघावें, कोणती वस्तू कोठून खरीदी करावी, इत्यादी....तेव्हांच आपण तेथे जाऊं किंवा नाही याचा निश्चय करतो, नाहीं? यासाठीं जर आपल्याला वाटतें की या जीवनांनंतर प्रभु येशू ख्रिस्तासंगती अनन्तकाळांत जीवन व्यतीत करुं, तेव्हां आपल्यांला काळजीपूर्वक त्याच्या वचनाचे अध्ययन करणे जरुरी आहे की येथे त्याच्या इच्छेनूसार कसे जीवन व्यतीत करावें.

या जगांमध्ये प्रत्येक जीवसांठी (जीवन) एक बीज आणि अंडकोषाची आवश्यकता असते. त्याचप्रकारे आत्मिक जगांमध्ये सूध्दा “अंडकोष” आपली आत्मा आहे आणि “बीज” अविनाशी अनन्तकाळ देवाचे वचन आहे.

*“कारण तुम्हीं नाशवंत बीजापासून नव्हे, तर अविनाशी बीजापासून म्हणजे ‘देवाच्या सदाजीवी व टिकणाऱ्या’ वचनाच्या द्वारें पुनः जन्मविलेले आहां. कारण, सर्व मानवजाति गवतासारखी आहे, आणि तिचे गौरव गवताच्या फुलासारिखें आहे. गवत सुकतें व त्याचें फूल गळतें. परंतु प्रभूचें वचन सर्वकाळ टिकतें. ज्या वचनाची ‘सुवार्ता’ तुम्हांस सांगितली, ते हेच आहे.”* (1 पेत्राचे पत्र 1:23–25).

जसे अगोदर सांगितले गेले की आता आपण देवाच्या घराण्यांत नवीन जन्मलेल्या बालकांसारखे आहां. नवीन जन्मलेल्या बालकांचे मुख्य जेवण दूध असते, *“देवाचे वचन आध्यात्मिक निरे दूध आहे”* (1 पेत्रांचे पत्र 2:2)

*“मनुष्य केवळ भाकरींनें नाहीं, तर देवाच्या मुखांतून निघणाऱ्या प्रत्येक वचनानें वांचेल”* (मत्तय 4:4)

यासाठी, कृपाकरुन आपले पवित्र शास्त्र रोज वाचा, अध्ययन करां आणि मनन करां, आणि शुभवर्तमानाला दुसऱ्यांना सूध्दा द्या. या प्रकारे आपण ख्रिस्तामध्ये शक्तिशाली व्हालं. पवित्र शास्त्र सांगते, आमची “चांगली कृत्यें” देवांसमारे “घाणेरड्या वस्त्रासारखी” आहेत (यशया 64:6). आमची मंडळी किंवा आमची संस्था आम्हाला नर्कापासून वाचवू शकत नाही. आमचे पाळक किंवा प्रिस्ट किंवा मूल्लाह आम्हांला नर्काच्या आगीपासून वाचवू शकत नाही. आमच्या पापांमुळे सर्व लोक पापाचे हिस्सेदार आहेत, तेच स्थान, ज्याच्यासाठी आमची लायकी आहे (रोमकरांस पत्र 6:23b). कोणीही मनुष्यप्राणी आम्हांला नर्केच्या आगीपासून वाचवू शकत नाहीं, फक्त प्रभु येशू ख्रिस्तच आम्हाला वाचवू शकतो.

*“आणि तारण दुसऱ्या कोणांकडून नाहीं, जेणेंकरुन आपलें तारण व्हावयाचें असें दुसरें नाम आकाशाखालीं मनुष्यांमध्यें दिलेले नाहीं.”* (प्रेषितांची कृत्ये 4:10,12).

पवित्र शास्त्र या प्रकारे सांगतें कीं आम्हीं “स्वर्ग” (सार्वकालिक जीवन) प्राप्त करुं शकत नाहीं. हे प्रभु येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवानें आम्हाला दिलेले फुकटचे बक्षीस आहे. हे देवाकडून आम्हांला विश्वासाने प्राप्त करायचे आहे.

*“तुमचे तारण कृपेनेंच विश्वासाच्या द्वारे झालें आहे आणि हे तुमच्या हातून झालें नाहीं, तर हे देवाचें दान आहे.”* (इफिसकरांस पत्र 2:8–9).

देवानें शुभवर्तमानाला (तारण) त्याच्या कृपेनें (या कृपेनें ज्याच्यासांठी आमची लायकी नव्हतीं) आम्हांला उपलब्ध केलें, आम्हांला विश्वासाच्या (विश्वास आणि भरोसा) द्वारें प्राप्त (घ्यायला) करायला पाहिजें.

दया आणि कृपा काय आहे?

दया आणि कृपामध्यें साम्यता नाही परन्तु ते एकच नाणेच्या दोन बाजू आहेत. मनुष्याला देवाच्या स्वरुपांत त्याला प्रेम करण्यांसाठी, त्याची स्तुति करण्यांसाठी, आणि त्याची आज्ञा पालन करण्यांसाठी बनविल्या गेले. देवानें मनुष्याला फक्त चयन करण्यासाठी वेळ दिली आणि मनुष्यानें देवाची आज्ञा न मानून त्याच्या विरोधात पाप करणे निवडलें. याप्रकारे आम्हीं आशारहित त्या नर्केच्या आगीसाठीं दोषी बनलो.

ज्या नरकेच्या आगीसाठी आम्हीं लायक होतों त्या नर्केच्या दण्डाला (तो दण्ड आम्हांला देत नाहीं) नजरअंदाज करुन तो दण्ड आम्हांपासून तो थांबून घेतो, ती दया आहे. देव आम्हांला फुकटचे सार्वकालिक जीवन आणि प्रभु येशू खिस्ताद्वारें स्वर्गाची वाचा देतो, ज्याचे आम्हीं हकदार नव्हतों, ती कृपा आहे.

असे समजून चला कीं तुम्हीं एका मोठ्या राशिसाठी कर्जदार आहां. एके दिवशी तो व्यक्ति तुमच्याजवळ येतों आणि जितकी राशि तुमच्यांवर कर्जाच्या रुपानें आहे त्या राशिची दोनपट राशिचा चेक तो तुमच्या नावांवर लिहून देतों. तो म्हणतों कीं त्यानें तुमचा कर्जाची क्षमा केली आहे आणि बक्षीस म्हणून ही राशि तुम्हांला देत आहे. हे कृपेचे कार्य आहे. या जगाचे सर्वात मोठे कृपेचे कार्य कलवरीच्या वधस्तंभावर झाले जेव्हा प्रभु येशू खिस्तानें तुमच्या जागी मरण पत्करुन सार्वकालिक मरणांपासून तुम्हांला सोडविले. यास्तव तुम्हीं असे काहीं केले नाहीं जेणेंकरुन आपली लायकी होईल आणि अशी काहीं आशा नाहीं कीं ज्यासाठी आपण काहीं किंम्मत देऊ शकता.

या गोष्टीला अजून सोपे बनविण्यांसाठी, जो देव तुम्हांला, मला आणि संपूर्ण मानवजातिला प्रेम करतों तो आपल्या ‘कृपेच्या’ भरपूरीमध्ये आला. न्याय करुन आमच्या पापाला क्षमा दिली जेणेकरुन आपल्या इच्छेनें शर्तेविना तो आम्हांला प्रेम करु शकतो. हे वर्णनाच्या बाहेर आहे. त्याला समजून घेण्यांसाठी तुम्हांला त्याची प्रतीती करायला पाहिजे. (स्तोत्रसंहिता 34:7).

जर आपण त्याला आपला प्रभु आणि तारणारा स्वीकार न करता मरता, तेव्हां आपण त्या न विझणारी, कधी समाप्त न होणारी नर्काच्या आगीमध्ये हरवून जाणार. <u>हीच नवीन जन्म घेणारे किंवा तारण झालेल्यांची गंभीरता आहे</u>. फक्त येशू स्वर्गांसाठी एकमात्र मार्ग आहे. (योहान 10:6, 14:6).

जर आपला जन्म खिस्ती घराण्यांत झाला आहे, तेव्हां तुम्हीं विचार करता कीं तुम्हीं आपोंआप खिस्ती बनु शकता. परन्तु हे सत्य नाहीं. सत्य हे आहें कीं कोणीहीं खिस्ती बनून जन्माला येत नाहीं किंवा कोणीहीं जन्म घेऊन किंवा काळजी घेऊन कोणी खिस्ती बनत नाहीं. एका व्यक्तिसाठी ही वाईट गोष्ट नाहीं कीं तो मुस्लिम, हिन्दू किंवा कोणत्यांहीं धार्मिक घराण्यांत जन्म घेतो. कारण असे लिहिले आहे कीं *“कारण देवांजवळ पक्षपात नाहीं”.* (रोमकरांस पत्र 2:11). प्रभु येशू खिस्त सर्व मनुष्यांसाठी मरण पावला. (योहान 1:12–13, रोमकरांस पत्र 5:6 पाहां). देवाचा काहीं धर्म नाहीं, तो सर्वांना प्रेम करतों.

अशा तुम्हांमध्यें यहूदी व हेल्लेणी, दास व स्वतंत्र, पुरुष व स्त्री, सुंता व बेसुंता, बर्बर व स्कुथी, दास व स्वतंत्र, कॅथलिक व प्रोटेस्टंट, आर्थोडक्स व अपोस्कोपोलियन, मेथोडिस्ट व बॅप्टिस्ट, नावांचे ख्रिस्ती व मुस्लिम, हिन्दू व बुध्द असा भेदभाव नाहीं. फक्त ख्रिस्त सर्व आणि सर्वांमध्ये आहे. (संदर्भ गलतीकरांस पत्र 3:28, कलस्सैकरांस पत्र 3:11).

*"यहूदी व हेल्लेणी यांमध्ये भेद नाहीं, कारण सर्वांचा प्रभु एकच असून जे त्याचा धावा करितात त्या सर्वांस पुरवठा करण्याइतका तो संपन्न आहे. जो कोणी प्रभु* (येशू) *चे नावं घेईल, त्याला तारण प्राप्त होईल".* (रोमकरांस पत्र 10:12-13).

पुष्कळ लोक विश्वास करितात कीं देव, स्वर्ग, शैतान कोणीही नाहीं. थोडेसे लोक विश्वास करितात कीं प्रेमळ देव आपल्याला नर्कात टाकणार नाही. पुष्कळ लोग नर्केच्या कल्पनेंवर उपहास करतात. परन्तु नर्क एक वास्तविकता आहे. काहीं लोक विचार करितात कीं ते देवाला शेवटच्या क्षणीं हाक मारतील, परन्तु दुखाची गोष्ट ही कीं शेवटच्या क्षणीं ते पडतील आणि मरण पावतील. त्यांना शेवटचा अवसर मिळणार नाहीं. प्रथम संधीच उत्तम आहे, कृपाकरुन तिला बुध्दिने उपयोगांत आणा. कसेबसे वाचविलेले संपूर्णपणे हरवलेले आहे.

प्रख्यात लेखक देन्त ने याप्रकारे लिहीले, *"सुज्ञ इसमानें खाली जाऊं नये म्हणून त्याचा जीवनमार्ग वर जातो".* (नीतिसूत्रें 15:24) याचा अर्थ असा आहें कीं जर कोणी व्यक्ति शंभर वर्षेपर्यंत जीवंत राहतो, तो चर्च किंवा मंदिरांत नियमित रुपाने जातो, नेहमी प्रार्थना करतो, दान देतो, गरिब लोकांची सहायता करतों. बाळ असतांनाच त्याचा बप्तिस्मा झाला, तो प्रभुभोजन सुध्दा घेतों, इत्यादी .....

परन्तु जर प्रभु येशू ख्रिस्तासंगती त्याचे व्यक्तिगत नाते नाहीं तर तो असफल आहे. जो पर्यंत तो प्रभु येशू ख्रिस्ताला आपला तारणारा म्हणून हाक मारित नाहीं तो पर्यंत येशू ख्रिस्त त्याला नर्केच्या आगीपासून वाचवूं शकत नाहीं, यामुळे नाहीं कीं त्याच्यामध्यें सामर्थ्य नाहीं किंवा तो अयोग्य आहें परन्तु यासाठीं कीं तो आपल्या वचनांमध्ये बदलत नाहीं. *"येशू ख्रिस्त काल, आज व युगानुयुग सारखाच आहे"* (इब्री लोकांस पत्र 13:8).

*"कारण मी परमेश्वर बदलणारा नव्हें"* (मलाखी 3:6).

लेकरें, देवाचे दान आहेत. आई-वडिलांनी आपल्या लेकरांवर प्रीती करावी. जेव्हां लेकरें आपल्या आई-वडिलांवर प्रीती करितात आणि त्यांच्या आज्ञेचा पालन करितात, तेव्हां त्यांना खूब आनन्द होतों. आज्ञा न मानणारी लेकरें त्यांच्या आई-वडिलांवर नेहमी ओझे होतात. आम्हांला नेहमी देवाची आज्ञा मानणारी मुले बनायला पाहिजे. यामुळे देवाला आनन्द होतो.

आता, देवाच्या कृपेनें तुम्हीं त्याची मुलें बनविल्या गेली. आपल्या स्वर्गीय पितासाठी तुमचे प्रथम पाऊल पाण्याचा बप्तिस्मा घेणे होय. (रुपक रीतिने). स्वतःला प्रभु येशू ख्रिस्ताचे मरण, मातीमध्ये पूरवणें आणि पुनरुत्थानच्या समानतेमध्यें दर्शविणें

जेणेंकरुन तुम्हीं पुनरुत्थानच्या जीवनांत नवीन रीतिने चालू शकता. बप्तिस्माद्वारें आम्हीं ख्रिस्ताला पांघरुन घेतों. आज्ञाचे पालन करणें आशिर्वादाचे एकमात्र मार्ग आहे. (रोमकरांस पत्र 6:3-4, गलतीकरांस पत्र 3:27, कलस्सैकरांस पत्र 2:12 इत्यादी...)

आता देवानें आपल्यांवर आपली छाप सोडायला पाहिजे कीं आता तुम्हीं त्याचे आहां. तुमच्यांत पवित्र आत्मा एका राशिप्रमाणें आहे कीं तुम्हीं देवाच्या सार्वकालिक घराण्यांचे आहां. आपल्याला पवित्र आत्म्याच्या भरपूरीची आवश्यकता आहे, जे अन्यन्य भाषा बोलण्याच्या द्वारें आणि नवीन पवित्र जयवन्त ख्रिस्ती जीवन जगण्याद्वारें प्रमाणित होईल.

असे समजून चला कीं आम्हीं नवीन घर बनवितों. आम्हीं त्याला आपल्या जरुरतीच्या सामानांने सांवरतों, नवीन सोफा, जेवणांची टेबल, कुरसी, सांज-संवरलेली झोपण्याची खोली, स्वयंपाकघराचे सामान इत्यादीं. पण जर आमच्यांजवळ इलेक्ट्रिसिटी नाहीं तर आपण कसे राहू शकता? त्याचप्रमाणें नवीन जन्म प्राप्त केलेल्या ख्रिस्ती जणांला पवित्र आत्म्याची भरपूरी आणि पवित्र आत्म्याची वासाचीं (अभिषेक) आवश्यकता आहे. जर प्रभु येशू ख्रिस्ताला या पृथ्वीवर असतांना पवित्र आत्म्याच्या वासाची (अभिषेक) आवश्यकता झाली, तेव्हां आम्हांला किती जरुरत झाली पाहिजे. (लूक 4:1, योहान 3:34, प्रेषितांची कृत्यें 10:38 इत्यादीं) (लूक 11:11-13).

पवित्र शास्त्रांमध्ये आमची तूलना वृक्षाशी केलेली आहे. प्रभु येशू ख्रिस्ताने म्हटलें कीं चांगले वृक्ष आणि वाईट वृक्ष त्याच्या फळानें ओळखल्या जातें. जे वृक्ष चांगले फळ आणित नाहीं ते कापून आगीमध्ये (नर्काच्या) टाकले जाईल.
पवित्र शास्त्र आम्हांला आज्ञा देते कीं आपण पश्चाताप करुन चांगले फळ (विश्वाशाचीं चांगली कृत्यें) आणावे (याकोब 2:14-26).

*"अज्ञानाच्या काळांची देवानें उपेक्षा केली, परन्तु आतां सर्वांनीं सर्वत्र पश्चाताप करावा अशी तो मनुष्यांस आज्ञा करितो...आणि यरुशलेमापासून आरंभ करुन सर्व राष्ट्रांस त्याच्या नामानें पश्चाताप व पापक्षमा गाजविण्यांत यावी."* (प्रेषितांची कृत्यें 17:30, लूक 24:47).

पश्चाताप वास्तविक काय आहे?
तुम्हीं (सर्व लोक) नर्काकडे जात होते. जातांना तुम्हीं प्रभु येशू ख्रिस्ताचे शुभवर्तमान ऐकले. तेव्हा पवित्र आत्म्यानें तुम्हांला 'पाप' 'नीतिमत्व' आणि 'सार्वकालिक न्याय' विषयी समजविलें आणि तुम्हांला समजलें कीं तुम्हीं पापी आहांत आणि नर्काकडे जात होते. तुम्हीं तेथेच थांबले, आपल्या पापांपासून वळलें आणि देवाकडून आपल्या पापांची क्षमा मागितली (दुख प्रकट केलें), आणि निश्चय केली की तुम्हीं ख्रिस्ताच्या मागें जाणार. हे पश्चातापाचीं शुरुआत (पहले पाऊल) आहे.

याचा साधारण अर्थ आहे, 'मागे फिरणे' म्हणजे ईश्वररहित जीवनांपासून देवाकडून फिरणें. कृपाकरुन आपल्या हृदयाला दीन करां आणि पवित्र आत्म्याला आपले

जीवन..आपला व्यवहार, आपले पाहणें आणि विशेषतः आपल्या शब्दांला देवाच्या वचनांने बदलू द्या.

जे काहीं आपण आपल्या जीवनांत करतोंः चर्च, मंदिर, मस्जिदला जाणें, प्रार्थना आणि उपवास करणें, गीतें गाणें आणि चांगली कृत्यें करणें इत्यादीं...सर्व काहीं जर पश्चाताप विना झाली तर ते ‘मृत कार्य’ आहें.

(इब्रीकरांस पत्र 6:1) यासाठीं कीं आपण पापांसाठी मेलेले आहों, आम्हीं काहीं पण चांगली कृत्यें करण्यांसाठी असमर्थ आहों, जेणेकरुन देव प्रसन्न होईल. (कलस्सैकरांस पत्र 2:13). फक्त देवच आपल्याला मृत्यूंपासून जीवंत ठेवू शकतों. (इफिसकरांस पत्र 2:1). देवाला परवानगी देवून आपल्या मनाला त्याला समर्मित करुन आम्हांला ख्रिस्तामध्यें नवीन उत्पत्ति बनायला पाहिजें. तेव्हांच आपण आपल्या जीवनांसाठी देवाची इच्छा समजू शकतो आणि संसाराच्या जीवनांतून फिरुन अशे जीवन जगू शकतों कीं त्यामूळें देव प्रसन्न होईल. (रोमकरांस पत्र 12:1-2). फक्त देवच आम्हांला मदत करु शकतो.

ज्या व्यक्तिच्या हृदयात येशू ख्रिस्त आहे तो कधीहीं स्वतःच्या खुशीनें किंवा काळजींच्या भयानें, अपराध, लाज, भय, आशाहिनता, एकाकीपणानें जीवन जगू शकत नाहीं. या सर्व गोष्टींतून तो प्रभु येशू ख्रिस्ताच्या द्वारें स्वतंत्र होतों (रोमकरांस पत्र 8:17-22, 8:2).

ज्या लोकांना आपण रोज भेटतों, त्यांना तुमच्या जीवनांत बदल दिसायला पाहिजे, आणि त्यांनी तुम्हांला विचारयला पाहिजे, अरे, “आपल्याला काय झालें’ हे काय आहें? तुम्हीं तर अशे नव्हंता” तेव्हां तुम्हीं त्यांना सांगू शकता, “हे यांसाठी आहे, कारण प्रभु येशू ख्रिस्त माझ्यां आंत आहे, त्यानें मला बदललेलें आहें”.

या संधीचा फायदा उचलून त्यांना शुभवर्तमानांबद्दल सांगा, प्रभु येशू ख्रिस्ताला आपल्या जीवनांत आमंत्रित करुन ते कसे देवाची मुले बनू शकतात आणि कसे नवीन जन्म प्राप्त करुन वाचू शकता. देवबाप तुम्हांला हे कार्य करण्यांसाठी सामर्थ्य देवों.

ख्रिस्ती जीवन वास्तविकतेंमध्यें दोन व्यक्तिच्यामध्यें एक व्यक्तिगत नातें आहे, माझें आणि प्रभु येशू ख्रिस्तांमध्यें आणि तुमचें आणि प्रभु येशू ख्रिस्तांमध्यें. आई-वडिलांना आपल्या लेकरांना बोलतांना पाहून चांगले वाटतें, आणि लेकरांनासूध्दा आपल्या आई-वडीलांची चांगली गोष्ट बरी वाटतें. प्रार्थना हे आपल्या आणि स्वर्गीय पिता, देव आणि त्यांच्या लेकरांमध्ये संवाद आहे. आम्हीं प्रार्थनेमध्यें देवबापांसंगती बोलतों आणि चालतों. जेव्हां देव बोलायला शुरुआत करतों तो पर्यंत आम्हीं निघून जातों. कृपाकरुन संयम आणि काळजीपूर्वक प्रार्थनेंमध्यें थांबून राहा जेणेंकरुन देवाची आवाज आम्हीं ऐकू शकू आणि याप्रकारे प्रभु येशू ख्रिस्तांसंगती जवळचा नाता ठेवू. आपल्या नात्यांला जीवंत ठेवा.

आठवणींत राहू द्या. आमच्यापैंकी प्रत्येकांला न्यायाच्या दिवशीं देवासमोर उभे राहायचे आहे आणि या पृथ्वींवर आम्हीं जे काहीं करतों, बोलतों आणि विचार करतों त्याबद्दल आम्हांला जाब द्यावे लागणार. पवित्र शास्त्र सांगतें, *“ज्या अर्थी मनुष्यांस एकदाच मरणें, व त्यानंतर न्याय होणें नेमून ठेविलें आहें.* (इब्रीकरांस पत्र 9:27). देवानें वेळ नियुक्त केलेली आहें, यासाठीं कीं न्यायांच्या दिवसी आमच्यांपैकीं प्रत्येकजण व्यक्तिगत् रुपानें आमोरा-सामोरें भेटूं. यामध्यें कसल्या प्रकारची सुट नाहीं. कोणीहीं यातूंन सुटू शकत नाहीं. यासाठी आपण याप्रकारचे जीवन जगूं की उद्या आम्हांला देवासमोर उभे रहावे लागणार.

सर्व गोष्टींना जाणून घेणारा, सर्वज्ञानी देव जाणतों कीं, “मनुष्य काय बनणार”. परन्तु “मनुष्य काय बनेल” या आधारांवर त्याने न्याय केला नाहीं. देव कोणाचाहीं पक्षपात करित नाहीं. (अनुवाद 10:47, रोमकरांस पत्र 2:11, याकोब 2:9). जेव्हां काहीं असफल होते, तेव्हां काही वाईट गोष्टीं आमच्या जीवनांत होते, तेव्हां आम्हीं म्हणंतो, हेच आमच्या भाग्यांत आहे. परन्तु आमचे भाग्यसूध्दा अचानकपणे येत नाहीं. ही एक निवडणूक आहे. ही अशी गोष्ट नाहीं कीं ज्यासांठी आम्हीं वाट बघतों. ही एक अशी गोष्ट आहें कीं ज्याच्यासांठी आम्हांला निवडणूक करायला पाहिजे आणि त्याला प्राप्त करायला पाहिजे. वेळ आणि लाटां आणि याचप्रकारें मृत्यू कोणाची वेळ पाहत नाही. मृत्यू कोणांवरहीं कोणत्याहीं वेळी येते. मृत्यूनंतर कोणासाठीहीं कोणीहीं काहीं करु शकत नाहीं.

प्रत्येक कार्याची प्रतिक्रिया आहे, आणि प्रत्येक निवडणूकीचा परिणाम आहें. आमचे भाग्य आपल्या निवडणूकीचा परिणाम आहे. यासाठीं देवानें मनुष्यालां निवडणूकीचीं स्वतंत्रता दिली. पुष्कळ लोक या गोष्टीला समजत नाहीं कीं देवाने आम्हांला आशीर्वाद किंवा स्राप, किंवा स्वर्ग किंवा नर्क निवडण्याचीं स्वतंत्रता दिली. (अनुवाद 30:19). परन्तु हे तुमचे बुध्दिने केलेली निवड आहें, जे आपण या पृथ्वींवर राहून करतां, जेणेकरुन आपण स्वर्गांत जावू शकूं.

आपल्यांला हे माहित नाहीं कीं उद्या काय होणारं, पवित्र शास्त्र असे सांगतें कीं मृत्यू कधीहीं सूचनाविना येते. आम्हांला नेहमी तैय्यार राहायला पाहिजे. वर दिलेल्या प्रार्थनेला आपण म्हटले का? आणि जर नाहीं, तर मी आपल्याला विनंती करतों कीं आपण आता प्रार्थना करां आणि देवाच्या फुकटच्या दानाला प्राप्त करा, आणि येणाऱ्या देवाच्या क्रोधांपासून आणि नर्काच्या आगीपासून जपून राहा. यास्तव या, आपण प्रार्थना करुं याः

**प्रिय देवा, मी पापी आहें. कृपाकरुन माझ्या पापाची क्षमा कर. प्रभु येशूच्या मोलवान रक्तानें धुवून मला शूध्द कर, आणि मला बर्फासारखे शुभ्र कर. मी विश्वास करतों कीं येशू माझ्यांसाठी मरण पावला, पूरल्या गेला. मी विश्वास करतों कीं आपण येशूला मेलेल्यांतून जीवंत केले. आता येशूला मी माझ्या जीवनाचा प्रभु आणि आपला तारणारा म्हणून स्वीकार करतों. माझ्या प्रभु येशू कृपाकरुन आता आपण माझ्या हृदयांत या. मी माझी आत्मा, मन आणि शरीर आपणाला समर्पण करतो. प्रभु येशूच्या नावांने मी माझ्या जीवनांतल्या त्या शैतानाला डपटतों. प्रभु येशू, कृपाकरुन आपण मला पवित्र आत्म्यानें भरा आणि आपणाला जे बनवायचे आहे, ते बनवां आणि सत्यांत माझे मार्गदर्शन करां. मी आपले उपकार मानतों. पित्या कीं आपण माझ्या पापांची क्षमा केली आणि माझ्या जीवनाला वाचविले आणि मला आपली मोलवान संतान बनविलें. येशू ख्रिस्ताच्या नावांने**

**प्रार्थना करतों, आमीन.**

जर आज (ह्या साईटच्या द्वारें) आपण प्रार्थना केलीं आणि प्रभु येशू ख्रिस्ताला स्वीकार केले, तेव्हां आपण मला sarah@his-amazing-love.org ला ई-मेल करुं शकता जेणेंकरुन मी सूध्दा आपणांसोबत आनन्द करीन.

आता आपल्याला माहीत आहें कीं जर व्यक्तिनें प्रभु येशू ख्रिस्ताला आपला प्रभु आणि तारणारा म्हणून स्वीकारलें नाहीं तर तो व्यक्ति मरणांनंतर सार्वकालच्या नर्कामध्ये जाईल. यासांठी तुरन्त ही वेब-साईट आपल्या आणि आपल्या प्रिय नातेवाईकांना पाठवा. त्यांना सूध्दा आशीर्वाद मिळू द्या.

जेव्हां आपण याला दूसऱ्यांमध्ये वाटतां, तेव्हा आपले 'आनन्द' वाढतें आणि दु:ख कमीं होते, जेव्हां आपण त्याला दुसऱ्यांमध्ये वाटतों. फक्त एका क्लिकच्या द्वारें आपण याला एक खाली दिलेल्या फॉर्म भरुन आपल्या सर्व मित्रांना पाठवू शकतों, जेणेकरुन या समाचाराला दुसऱ्यांमध्ये वाटून तुमचे आनन्द वाढेल. ते सर्व ख्रिस्तांमध्यें आशीर्वादीत होतील.

कृपाकरुन या साईट वर निशाण लावा आणि आपल्या रोजच्या जीवनांत याला दुसऱ्यांना सांगण्यासाठी सिफारिस करा.

तुमच्याजवळ पवित्र शास्त्र आहें काय? कृपाकरुन ही तारीख (आज) आपल्या पवित्र शास्त्रांत लिहून घ्या, 'मी वाचविल्या गेलो आहे' (आजची तारीख) किंवा 'मी प्रभु येशू ख्रिस्ताला आपला तारणारा म्हणून स्वीकार केला आहे (आजची तारीख) किंवा या दिवसी मीं ख्रिस्ती झालों (आजची तारीख). हे आपले आत्मिक वाढ़दिवस आहे.

जर कोणी आपल्याला विचारले कीं, "तुमचे तारण झाले आहें काय किंवा तुमचा नवीन जन्म झाला काय? तेव्हां तुम्हीं सांगा, "होय, त्याच्या कृपेनें, माझे तारण झाले आहे, माझा नवीन जन्म झाला आहे". देव तुम्हांला पुष्कळ आशीर्वाद देवों.

*"सार्वकालिक जीवन तुम्हांस आहे हें तुम्हांस कळावें म्हणून देवाच्या पुत्राच्या नामावर विश्वास ठेवणाऱ्या तुम्हांस हें मीं लिहिलें आहे"* (1 योहान 5:13).

माझ्या प्रभु आणि तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या मोलवान नामांमध्यें, जे सर्व नामांमध्यें उंच आहे, मीं आपल्या सर्वांना स्वर्गीय आणि आत्मिक आशीर्वाद देतो.

देव पिता जो स्वर्गामध्यें आहें त्याचे प्रेम, प्रभु येशू ख्रिस्त आणि तारणाऱ्याची शांति आणि कृपा आणि पवित्र आत्म्याचीं संगति तुमच्यासोबत नेहमी राहों, आमेन !

ख्रिस्तात आपली,

## सारा

१ करिंथ ३:१०-१४ आणि इफिस १२:१३-१४ अनूसार, आम्हांला सतत् यात्रा करणाऱ्या यात्रेकरुसारखें किंवा क्रेडिटधारकासारखें नेहमी अंक प्राप्त करायला पाहिजे. आज्ञापालनचे पहिले कार्य बप्तिस्मा घेणें आहे, ज्याचे सर्वात जास्त अंक आहे, दूसरे जास्त अंक नवीन जन्म प्राप्त केलेल्या दंशमांश देणाऱ्याला आहे, तिसरे जास्त अंक आत्म्यांवर जय पाणाऱ्यांना, आणि चौथा जास्त अंक पवित्रपणें आणि इमानदारीने जीवन जगाणाऱ्यांना दिलेला आहे. ज्या प्रकारें सिनेमा थियेटरमध्यें जमीनींवर, कुर्सीवर, एअरकंडिशनमध्यें बसण्यांची सोय असतें, त्याचप्रमाणें स्वर्गांतसूध्दा बक्षीसें आमची वाट बघत आहेंत.

*“माझा नीतिमान् पुरुष विश्वासानें वांचेल, तो जर माघार घेईल, तर त्याजविषयीं माझ्या जिवाला संतोष वाटणार नाहीं.”* (इब्री लोकांस पत्र 10:38).

ज्या व्यक्तिच्या हृदयांत खरोखर प्रभु येशू ख्रिस्त आहे तो कधीही स्वतःच्या आनन्दांत किंवा काळजीच्या भयांत, लज्जेंमध्यें, भयांत, आशाहिनतेंमध्यें जीवन जगू शकत नाही. त्याला देवाला प्रसन्न करण्यांसाठी जीवन जगायला पाहिजे आणि या सर्व गोष्टींपासून तो प्रभु येशू ख्रिस्ताच्या द्वारें स्वतंत्र होतों (रोमकरांस पत्र 8:17-22, 8:2).

ज्यां लोकांना तुम्हीं रोज भेटता, त्यांना आपल्या जीवनांमध्ये बदल दिसायला पाहिजे, आणि त्यांनी तुम्हांला विचारायला पाहिजे, “अरे, तुम्हांला काहींतरी झाले आहे, हे काय आहे? तुम्हीं तर असे नव्हतां.” तेव्हां तुम्हीं त्यांना सांगू शकता. “हे यामुळे झालें कारण प्रभु येशू ख्रिस्त माझ्यांमध्ये आहे, त्याने मला बदललेले आहे”.

कृपाकरुन या संधीचा फायदा घेवून त्यांना शुभवर्तमानांविषयी सांगा कीं, प्रभु येशू ख्रिस्ताला ते आपल्या जीवनांत आमंत्रित करुन कसे परमेश्वराची मुले बनू शकतात. देव तुम्हांला या कार्यासाठी सामर्थ्य देवों.

ख्रिस्ती जीवन वास्तवमध्यें दोन व्यक्तिंच्या मध्यें एक व्यक्तिगत नाते आहे, माझें आणि प्रभु येशू ख्रिस्तामध्यें आणि तुमचे आणि प्रभु येशू ख्रिस्तांमध्ये. आई-वडिलांना आपल्या लेकरांना बोलतांना बघून चांगले वाटते. आणि लेकरांना सूध्दा आपल्या आई-वडिलांच्या चांगल्या गोष्टी बऱ्या वाटतात. प्रार्थना आमच्या आणि देव स्वर्गीय पित्या आणि त्यांच्या लेकरांमध्ये संवाद आहे. आम्हीं प्रार्थनेंमध्ये देव पित्या बरोबर बोलतों आणि पूढे जातों. जेंव्हा देव बोलणें शुरु करतों तेंव्हापर्यंत आम्हीं निघून जातों. कृपाकरुन धैर्याने आणि काळजीपूर्वक प्रार्थनेमध्यें थांबून राहा जेणेकरुन देव आपले बोलणे ऐकू शकतों आणि याप्रकारें आपण प्रभु येशू ख्रिस्तासंगती जवळचे नातें ठेवू शकता. आपल्या नात्याला जींवंत ठेंवा.

सर्व गोष्टींला जाणून घेणारा, सर्वज्ञानी देव जाणतों कीं “मनुष्य काय बनेंल”. परन्तु “मनुष्य काय बनेल” या आधारांवर त्याने न्याय केला नाही. देव कोणाचा पक्षपात करित नाही (अनुवाद 10:47, रोमकरांस पत्र 2:11, याकोब 2:9) जेव्हां काहीं असफल

होते, काहीं चुकीच्या गोष्टीं आमच्या जीवनांत घडतात. तेव्हां आम्हीं म्हणतों, हे आमचे नसीब होते. परन्तु आमचे नसीब अचानक रीतिने नाहीं, ही एक निवडणूकीची गोष्ट आहे. ही अशी गोष्ट नाहीं कीं ज्यासाठी आपण वाट बघतो, ही एक अशी गोष्ट आहें कीं ज्यासाठी आम्हांला निवडणूक करायला पाहिजे आणि त्याला प्राप्त करायला पाहिजे. वेळ, लाटा आणि याचप्रकारें मृत्यू कोणाची वाट बघत नाही. मृत्यू कोणांवरहीं कधीहीं येऊ शकतें. कोणाच्याही मृत्यूनंतर कोणीहीं काहींहीं करु शकत नाहीं.

प्रत्येक क्रियेची प्रतिक्रिया असते, आणि प्रत्येक निवडणूकींचा परिणाम आहे. आमचे भाग्य आमच्या निवडणूकींचे परिणाम आहे. यासाठी देवानें मनुष्याला 'निवडणूकीची स्वतंत्रता' दिली. पुष्कळ लोक या गोष्टीला समजत नाहीं कीं देवानें आम्हांला आशीर्वाद किंवा स्त्राप, किंवा स्वर्ग किंवा नर्क निवडण्याचीं स्वतंत्रता दिली आहे. (अनुवाद 30:19). परन्तु हे आपल्या बुध्दिनें घेतलेलीं एक निवड आहे, जे तुम्हीं या पृथ्वींवर राहून करतां जेणेकरुन आपण स्वर्गाला जाणार.

आठवण करां. आमच्यांपैकी प्रत्येकाला न्यायाच्या दिवशी देवासमोर उभे राहावे लागणार आणि या पृथ्वीवर जे आम्हीं करतो, बोलतो आणि विचार करतो त्याचा जाब द्यावा लागेल. पवित्र शास्त्र सांगते, *"ज्याअर्थी मनुष्यांस एकदाच मरणें व त्यानंतर न्याय होणें नेमून ठेविलें आहे."* (इब्री लोकांस पत्र 9:27). देवाने वेळ ठरवलेली आहे जेणेकरुन तों आमच्यापैकी व्यक्तिगत रुपानें प्रत्येकांस न्यायाच्या दिवशी आमोरा-सामोरा भेट घेऊ शकतों. यामध्ये काहीं सूट नाहीं. यामधून कोणीही सुटू शकत नाहीं. यासाठीं आपण असे जीवन जगायला पाहिजे कीं उद्या आम्हांला देवासमारे उभे राहावे लागणार.

जगाच्या मोठ्या प्रख्यात जहाज दुर्घटना चेतावनीकडे दुलर्क्ष करुन झाली. प्रभु येशू खिस्ताचे शुभवर्तमान येणाऱ्या न्याय आणि सार्वकालिक नर्केच्या आगीविषयीं चेतावनी आहे. हे वेळ तुमची आहे कीं तुम्हीं या मोठ्या सार्वकालिक विपत्तीपासून स्वतःस वांचवा.

आम्हांला माहित नाही कीं उद्या काय होणार, पवित्र शास्त्र असे सांगते कीं मृत्यू कधीही पूर्व सूचना न देतां येते. आपल्याला नेहमी तैय्यार राहायला पाहिजे. वर दिलेल्या प्रार्थनेला काय आपण म्हटलेले आहे? आणि जर नाही, तर मी आपल्याला अजून एकदा विनती करतें कीं आता आपण प्रार्थना करां आणि देवाच्या सार्वकालिक जीवनाचे फुकटचे दान घ्यावे, आणि येणाऱ्या देवाच्या क्रोधापासून आणि नर्काच्या आगीपासून स्वतःस वाचवूंन घ्या. यासाठी या, आपण प्रार्थना करुंः

**प्रिय देवा, मी पापी आहें. कृपाकरुन माझ्या पापाची क्षमा कर. प्रभु येशूच्या मोलवान रक्तानें धुवून मला शूध्द कर, आणि मला बर्फासारखे शुभ्र कर. मी विश्वास करतों कीं येशू माझ्यांसाठी मरण पावला, पूरल्या गेला. मी विश्वास करतों कीं आपण येशूला मेलेल्यांतून जीवंत केले. आता येशूला मी माझ्या जीवनाचा प्रभु आणि आपला तारणारा म्हणून स्वीकार करतों. माझ्या प्रभु येशू कृपाकरुन आता आपण माझ्या हृदयांत या. मी माझी आत्मा, मन आणि शरीर आपणाला समर्पण**

करतो. प्रभु येशूच्या नावांने मी माझ्या जीवनांतल्या त्या शैतानाला डपटतों. प्रभु येशू, कृपाकरुन आपण मला पवित्र आत्म्यानें भरा आणि आपणाला जे बनवायचे आहे, ते बनवां आणि सत्यांत माझे मार्गदर्शन करां. मी आपले उपकार मानतों. पित्या कीं आपण माझ्या पापांची क्षमा केली आणि माझ्या जीवनाला वाचविले आणि मला आपली मोलवान संतान बनविलें. येशू ख्रिस्ताच्या नावांने प्रार्थना करतों, आमीन.